# गोपींचे बोलणे, लिखाण आणि समष्टी साधना

## अनुक्रमणिका


**१. कलियुगातील सनातनच्या गोपींचे बोलणे** १५

१ अ. गोपी तृप्ती १५

* वैशिष्ट्यपूर्ण बोलणे १५
* प.पू. डॉक्टरानी विचारलेल्या प्रश्नांना गोपी तृप्तीने दिलेली भावपूर्ण उत्तरे १६

१ आ. गोपी दीपाली २०

* गोपी दीपालीचे कृष्णमय दृष्टीकोन ! २४
* बोलण्यातील हुशारी २६
* उत्तरांतील प्रगल्भता २९

१ इ. गोपी वृषाली ३२

१ इ १. प.पू. डॉक्टरांनी ‘तूही सुंदर दिसतेस’, असे गोपी वृषालीला म्हटल्यावर बाह्य सौंदर्य प्रसाधनांपेक्षा भक्तीभाव आणि साधना यांमुळे येणारे आंतरिक सौंदर्यच चिरकाल टिकणारे असते, अशी तिची विचारप्रक्रिया होणे ३२

१ इ २. ‘श्रीकृष्ण पूर्णावतार आणि सर्वगुणसंपन्न असतांना त्याने भक्तांना एकेक गुणच का दिला ?’, या प.पू. डॉक्टरांच्या प्रश्नावर गोपी वृषालीचे उत्तर ३२

**२. गोपींचे लिखाण** ३४

२ अ. गोपी तृप्ती ३४

२ अ १. भक्त्युत्तर ज्ञान (भक्तीनंतर होणारे ज्ञान) ३४

२ आ. गोपी दीपाली ३८

* कृष्णभक्तीवर आधारित लिखाण ३८
* लिखाणातून प्रतिभा व्यक्त होणे ४५
* आध्यात्मिक स्तरावर विवेचन करू शकणे ६२

२ इ. गोपी वृषाली ६८

* ज्ञानमार्गानुसारच्या विश्लेषणापेक्षा कृष्णभक्तीवर आधारित उत्तरात शुष्कता नसून भाषेचा गोडवा असल्याने त्यातून अधिक आनंद मिळत असल्याची उदाहरणे ६८

**३. कृष्णभक्तीमुळे माधुर्य आलेल्या गोपी सर्वांना हव्याहव्याशा वाटणे** ७१

**४. गोपी समष्टी साधना करणार असणे** ७४

४ अ. गोपी तृप्ती ७४
* समाजाला मार्गदर्शन करू शकणे ७९
४ आ. गोपी दीपाली ७९
* प.पू. डॉक्टरांनी गोपींवर सगळ्यांना कृष्णभक्ती शिकवायचे मोठे दायित्व असल्याचे सांगितल्यावर गोपी दीपालीने सर्व काही श्रीकृष्णच करणार असल्याचे सांगणे ८५
* अध्यात्मप्रसारासाठी समाजात जाऊन व्यष्टी साधनेसह समष्टी साधनाही करणार असलेल्या गोपी ! ८५
४ इ. कलियुगातील गोपी इतरांना साधना शिकवणार असणे ८६
**५. श्रीकृष्णभक्तीचा व्यष्टी साधनेतील टप्पा गाठल्यानंतर समष्टी भाव, तळमळ आदी गुणांमुळे समष्टी सेवेचे दायित्व सहजतेने पेलणाऱ्या गोपीभावातील साधिका ८७**
**६. गोपींची सूक्ष्मातील वैशिष्ट्ये ८८**
*** गोपींच्या आध्यात्मिक गुणवैशिष्ट्यांची तुलना ९३**

## मनोगत

‘गोपीभाव असणाऱ्या साधिकांची वैशिष्ट्ये’ या ग्रंथमालिकेच्या पहिल्या भागात आपण ‘सनातन संस्थेला लाभलेल्या गोपीभावातील साधिकांचा कृष्णाप्रती भाव कसा उत्कट आहे आणि त्यांचे सातत्याने कृष्णाशी अनुसंधान असल्याने कृष्णाचीही त्यांच्यावर कृपा कशी आहे’, हे पाहिले. ग्रंथमालिकेच्या या दुसऱ्या भागात ‘गोपींचे बोलणे, लिखाण आणि त्या समष्टी साधनाही करत आहेत’, यांविषयी माहिती दिली आहे.

गोपींचे बोलणे कृष्णमय झाले आहे. त्यामुळे ते मधुर आणि भावपूर्ण आहे. गोपी आध्यात्मिक स्तरावरील कोणत्याही प्रश्नाचे तात्काळ उत्तर देऊ शकतात; कारण कृष्णच त्यांना सुचवतो. त्यांना कोणताच विचार करावा लागत नाही. दोन गोपी एकमेकींशी बोलतांना त्यांना स्वतःला तर आनंद मिळतोच; पण त्यांचे बोलणे ऐकणाऱ्यालाही आनंद मिळतो. गोपींच्या बोलण्यात जशी हुशारी आहे, तशी प्रगल्भताही आहे; कारण कृष्णात सर्वच गुण आहेत. जसे गोपींच्या बोलण्यात हे सर्व गुण आहेत, तसेच त्यांच्या लिखाणातही आहेत. त्यांच्या लिखाणात त्यांची प्रतिभाही जागृत झालेली दिसते. आधी कधीही कविता केलेल्या नसतांना त्या आता शीघ्रतेने कविता करू शकतात. त्या अध्यात्म आणि राष्ट्र या विषयांवरही लिखाण करू शकतात. प्रथितयश लेखकाच्या लिखाणात दिसणार नाही, अशी सुंदर भाषा गोपींच्या लिखाणात दिसते.

यावरून लक्षात येते की, भक्तीने कृष्ण मिळवला की, सर्वच मिळते, म्हणजे कृष्णाचे सर्व गुण आपल्यात येतात. हेच या ग्रंथाचे सार आहे. या तत्त्वानुसारच गोपींनी आधी जरी समष्टी साधना केलेली नसली, तरी सध्या काळाला आवश्यक अशी समष्टी साधना करण्याचे महत्त्व प.पू. डॉक्टरांनी गोपींवर बिंबवल्यावर त्या पूर्ण श्रद्धेने समष्टी साधना करण्यासाठी गेल्या आणि त्यांना कृष्णकृपेने ते दायित्व उचलणे शक्यही झाले.

या ग्रंथातील गोपींची गुणवैशिष्ट्ये वाचल्यावर सर्वांनाच भक्तीचे महत्त्व लक्षात येईल. सर्वांनी कृष्णभक्तीच करायला पाहिजे, असे नाही; कारण 'व्यक्ती तितक्या प्रकृती तितके साधनामार्ग', असे असल्याने कोणत्याही देवाची भक्ती आपण करू शकतो. या ग्रंथाचा उद्देश 'भक्ती करण्याचे महत्त्व सर्वांना कळावे आणि 'आपणही ईश्वरभक्ती अन् समष्टी साधना करावी', असे सर्वांना वाटावे', हा आहे. कृष्णकृपेने असे सर्वांना वाटू दे आणि ते त्यांना कृतीत आणता येऊ दे, हीच या ग्रंथाची फलश्रुति !'

**- (पू.) डॉ. मुकुल माधव गाडगीळ**